# दिवा न्यूज

दिशादर्शक, मार्गदर्शक!

▶ वर्ष–३

■ अंक–९



आता डिजिटल स्वरुपात...

दिवा न्यूजची वेबसाईट सुरु..!

ताज्या घडामोडी आणि बातम्यांसाठी लॉग इन करा

www.diwanews.com

आता कुठेही असा...दिवा न्यूज वाचा एका क्लिक वर..

epaper.diwanews.com



■ epaper.diwanews.com ■ सोमवार, २ ऑक्टोबर २०२३ ■ पाने–८ ■ किंमत ४ रु. ■ RNI No.-MAHMAR/2021/80669 ■ www.diwanews.com


# दिव्यातील नागरिकांना बेघर होऊ देणार नाही, शिवसेना नागरिकांच्या पाटीशी –रमाकांत मढवी

**दिवा:– त्या १४ इमारती तोडण्यासंदर्भातील निर्णय उच्च न्यायालयाने दिल्यानंतर तेथील साधारण दोन हजार नागरिकांच्या मागे दिवा शिवसेना खंबीरपणे उभी राहिली.त्यांना योग्य ते मार्गदर्शन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या माध्यमातून शिवसेनेने केले. सुप्रीम कोर्टामध्ये नागरिकांच्या बाजूने निकाल लागला.दिव्यातील अडचणीत असणाऱ्या नागरिकांना आम्ही बेघर होऊ देणार नाही असे मत या निकालानंतर रमाकांत मढवी यांनी व्यक्त केले.**

दिवा शहरात सोयी सुविधा उपलब्ध करून देताना रस्ता रुंदीकरणात बाधित झालेल्यांचे योग्य ते पुनर्वसन करण्याची भूमिका शिवसेनेने घेतली.शेवटी शहर वाढत असताना शहरात सोयी सुविधा वाढवणं गरजेचं असतं. परिणामी प्रकल्प बाधित असणाऱ्या नागरिकांना योग्य त्या ठिकाणी पुनर्वसन व्हावे यासाठी शिवसेना कायमच आग्रही राहिली.१४ इमारतींचे प्रकरण हे वेगळे होते.

इतक्या मोठ्या संख्येने राहणाऱ्या नागरिकांना बेघर व्हावे लागले असते. माणुसकीच्या दृष्टिकोनातून शिवसेना दिवा शहर या नागरिकांच्या पाठीशी ठामपणे उभी राहून त्यांना योग्य ते कायदेशीर मार्गदर्शन शिवसेनेने केले. या संपूर्ण प्रकरणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,खासदार श्रीकांत शिंदे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. दोन हजार नागरिक बेघर होऊ नयेत यासाठी साधारण चार वर्षाचा न्यायालयीन लढा नागरिकांच्या वतीने आम्ही दिला.आज या ठिकाणी नागरिकांच्या लढाला यश आलं असून सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिला त्याबद्दल आम्ही न्यायालयाचे आभार मानतो. दिव्यातील नागरिकांना आम्ही बेघर होऊ देणार नाहीत हीच आमची भूमिका असल्याचे रमाकांत मढवी यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले. आता न्यायालयाने संबंधित नागरिकांना महापालिकेकडे इमारती नियमित करण्यासाठी अर्ज करण्यास सांगितले आहे. त्यानंतर पालिका पुढील योग्य ती कार्यवाही करून येथील नागरिकांना घरे नियमित करण्यासंदर्भातील सूचना कळवेल व पुढील कार्यवाही होईल असेही रमाकांत मढवी म्हणाले. हा निर्णय ऐतिहासिक असून या निर्णयामुळे देशातील अशा प्रकरणांमध्ये नागरिकांना दिलासा मिळेल असेही रमाकांत मढवी म्हणाले.



*दोन हजार नागरिक बेघर होऊ नयेत यासाठी साधारण चार वर्षाचा न्यायालयीन लढा नागरिकांच्या वतीने आम्ही दिला.आज या ठिकाणी नागरिकांच्या लढाला यश आलं असून सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिला त्याबद्दल आम्ही न्यायालयाचे आभार मानतो. दिव्यातील नागरिकांना आम्ही बेघर होऊ देणार नाहीत हीच आमची भूमिका आहे. – रमाकांत मढवी*



## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून ईद-ए-मिलादच्या शुभेच्छा

**मुंबई :** ईद-ए-मिलादनिमित्त उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी राज्यातील जनतेला शुभेच्छा दिल्या. मोहम्मद पैगंबर यांची शांततेची शिकवण अंगीकारणे महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी म्हटले. उपमुख्यमंत्री फडणवीस संदेशात म्हणतात, **ईद-ए-मिलाद** हा सण परस्परांमधील विश्वास आणि प्रेम वाढविणारा आहे. मोहम्मद पैगंबर यांनी सर्व मानव जातीच्या कल्याणाचा संदेश आपल्या आचारातून आणि विचारातून दिला आहे. परस्परातील सामंजस्य आणि प्रेम वाढीस लागणे हे सर्वात महत्त्वाचे आहे.



**दिव्यातील समाजसेवक अशोक सोलंकी यांनी त्यांची मुलगी जिनलचा वाढदिवस डोंबिवली येथे अंकुर बाल विकास केंद्र अनाथ आश्रम मध्ये फॅमिली सोबत साजरा केला. अशोक सोलंकी यांनी यावेळी अनाथ आश्रमातील मुलांना भेटवस्तू व उपयोगाच्या वस्तू भेट स्वरूपात दिल्या.**





## कु.अथर्व अजय भोईर याने डेरवण येथील राज्यस्तरीय धावण्याच्या स्पर्धेत सुवर्ण पदक पटकावले



**दिवा :** महाराष्ट्र शासनातर्फे डेरवण येथे राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेतून संपूर्ण राज्यातून अत्यंत तरबेज खेळाडूंची निवड त्या त्या जिल्ह्यातून करण्यात येते. यासाठी दिव्याची शान अथर्व अजय भोईर याची निवड झाली होती. १६ वयाखालील मुलांच्या १०० मी , ३०० मी या दोन्ही धावण्याच्या स्पर्धेत त्याने सुवर्णपदक प्राप्त करून आपल्या ठाणे जिल्ह्याचा गौरव वाढवला आहे.



## दिव्यातील चहा टपरीत सिलिंडर स्फोट फायरमन किरकोळ जखमी मध्यरात्री पावणे तीनची घटना

**ठाणे:** दिवा, खर्डी गाव या ठिकाणी असलेल्या गणेश टी-हाऊस या चहाच्या टपरीमधील दोन सिलिंडरचा अचानक स्फोट होऊन आग लागली. या घटनेत दिवा बिटचे फायरमन प्रतीक बांबर्डे हे आगीवर नियंत्रण मिळविताना किरकोळ जखमी झाले असून ही घटना बुधवारी मध्यरात्री पावणे तीन वाजण्याच्या सुमारास घडली. तसेच ही आग जवळपास अर्ध्यातासांनी नियंत्रणात आली असून स्फोट झालेल्या त्या दोन्ही सिलिंडरचे अवशेष अग्निशमन दलाने ताब्यात घेतल्याची माहिती ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

दिव्यात सिलिंडर स्फोट होऊन आग लागल्याची माहिती मिळताच घटनास्थळी शीळ अग्निशमन दलाचे जवान ०१-फायर वाहनासह दाखल झाले. तातडीने आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम अग्निशमन दलाच्या जवानांनी हाती घेतले. याचदरम्यान आगीवर नियंत्रण मिळविताना फायरमन बांबर्डे हे जखमी झाले असून त्यांच्या हाताला किरकोळ दुखापत झाली आहे. ही चहा टपरी बिज्जू गुजर यांच्या मालकीची आहे. तर ही आग नेमकी कशामुळे लागली तसेच सिलिंडरचा स्फोट कसा झाला, हे अद्यापही समजू शकले नाही. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.



## ठाण्यात ९ वाहनांवर कोसळले गुलमोहर टँकर, रिक्षासह दुचाकी वाहनांचे झाले नुकसान

**ठाणे:** वागळे इस्टेट, कामगार हॉस्पिटल नाका या ठिकाणी असलेल्या ओमेगा बिझनेस पार्क या इमारतीच्या आवारातील गुलमोहराचे झाड पार्क केलेल्या तब्बल ०९- वाहनांवर कोसळल्याची घटना बुधवारी दुपारी सव्वा चार वाजण्याच्या सुमारास घडली. यामध्ये एका ऑटो रिक्षासह एक टँकर आणि ०७-दुचाकींचा समावेश असून त्या वाहनांचे नुकसान झाले आहे. त्यामधील रिक्षा ही सुर्याकुमार यादव यांच्या मालकीची असल्याची बाब पुढे आली आहे.

वागळे इस्टेट परिसरात झाड पडल्याची माहिती मिळताच घटनास्थळी वृक्ष प्राधिकरण विभागाचे कर्मचारी व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी तसेच अग्निशमन दलाचे जवान यांनी धाव घेतली. त्यावेळी ते झाड वाहनांवर पडल्याचे निर्दशनास आले. या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसली तरी त्या वाहनांचे नुकसान झाले आहे. तसेच पडलेले झाड कापून एका बाजूला करण्यात आले आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

पांच पाखाडी वंदना बस डेपोच्या बाजूला असलेल्या शिंदे चाळीवर झाडाची फांदी तुटून पडल्याची घटना बुधवारी सायंकाळी सव्वा पाच वाजण्याच्या सुमारास समोर आली. यामध्ये रमेश शिंदे यांच्या मालकीच्या घराच्या छतावर फांदी पडून त्या छताचा पत्रा फुटला आहे. त्यामुळे पत्र्याचे किरकोळ नुकसान झाले आहे. ती फांदी आपत्ती व्यवस्थापन कक्षेच्या कर्मचाऱ्यांनी कापून बाजूला केली आहे. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५
संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

दिशादर्शक, मार्गदर्शक!
दिवा न्यूज
सोमवार, दि. २ ऑक्टोबर २०२३

www.diwanews.com

## विविध देशांच्या वाणिज्यदूतांनी घेतले मुंबईतील गणरायांचे दर्शन

**मुंबई :** विविध देशांचे महावाणिज्य दूत, वाणिज्य दूत तसेच त्यांच्या प्रतिनिधींनी मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सवात सहभागी होऊन गणरायांचे दर्शन घेतले. हा सण समाजामध्ये एकतेची भावना निर्माण करणारा असल्याची भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली. महाराष्ट्रातील गणेशोत्सव हा धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळ्याबरोबरच पर्यटन उद्योगासाठीही चालना देणारा महोत्सव आहे. सांस्कृतिक देवाण-घेवाण घडवणारा, आर्थिक वृद्धी साधणारा हा सण आंतरराष्ट्रीयस्तरावर पर्यटकांच्या आकर्षणाचे केंद्र आहे.

# त्या २ हजार नागरिकांना सर्वोच्च दिलासा, दिवा शिवसेनेचा नागरिकांसाठी पाठपुरावा

## १४ निवासी इमारती तोडण्याचा उच्च न्यायालयाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाकडून रद्द

## रहिवाशांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, शिवसेना शहरप्रमुख रमाकांत मढवी यांचा पाठपुरावा, नागरिकांनी मानले आभार!

**दिवा:-** दिवा शहरातील पूर्व भागात कौटुंबिक वादात बहिणीने भावाविरुद्ध उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत उच्च न्यायालयाने निकाल देताना वादग्रस जागेवरील १४ निवासी इमारती तोडण्याचा निर्णय दिला होता.

उच्च न्यायालयाच्या निकालाने सन २००१ पासून राहणाऱ्या दोन हजारांपेक्षा जास्त रहिवाशांच्या पायाखालची वाळूच सरकली होती. उच्च न्यायालायने ठाणे महानगर पालिकेला सदर १४ निवासी इमारतींवर तोडक कारवाई करण्याचे निर्देश दिल्यामुळे यथे राहणाऱ्या ४२१ कुटुंबावर बेघर होण्याची टांगती तलवार उभी राहिली होती. रहिवाशांनी शिवसेना शहरप्रमुख, मा.उपमहापौर रमाकांत मढवी यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांच्याशी संपर्क करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले होते.

चार वर्षे न्यायालयीन संघर्ष दिल्यानंतर आज सर्वोच्च न्यायालयाने निर्णय देताना उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय रद्दबादल करत येथे राहणाऱ्या रहिवाशांनी सदर १४ निवासी इमारती नियमित करण्यासाठी महापालिकेकडे अर्ज करावा व असा अर्ज आल्यानंतर महापालिकेने पुढील तीन महिन्यात सदर इमारती नियमित कशा करता येतील असा अहवाल महापालिकेने सर्वोच्च न्यायालयात सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

**“ आम्ही ४ वर्ष न्यायालयीन लढा लढत होतो, या लढ्यात आम्हाला वेळोवेळी मार्गदर्शन आणि धीर देणारे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे व उच्च न्यायालयाने आमच्या इमारती तोडण्याचे आदेश दिल्यानंतर ज्या दिवशी महापालिका इमारती तोडण्यासाठी आली होती त्या दिवसापासून आमच्या सोबत असणारे, आम्हाला बेघर होण्यापासून वाचविणारे रमाकांत मढवी व नगरसेवक, नगरसेविका व शिवसेना पदाधिकारी यांचे मनापासून आम्ही आभारी आहोत.**

– रमण लटके, रहिवासी

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २ ऑक्टोबर २०२३



### मुंबई, कोकण विभाग पदवीधरसह नाशिक आणि मुंबई विभाग शिक्षक मतदारसंघांसाठी मतदार नोंदणीचा कार्यक्रम जाहीर

**मुंबई :** विधानपरिषदेच्या मुंबई आणि कोकण विभागाच्या पदवीधर मतदारसंघासाठी तसेच नाशिक आणि मुंबई विभागाच्या शिक्षक मतदारसंघांसाठी मतदार नोंदणी सुरू झाली आहे. १ नोव्हेंबर २०२३ या अर्हता दिनांकावर मतदार याद्यांचा हा पुनरीक्षण कार्यक्रम असेल, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी श्रीकांत देशपांडे यांनी मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघ येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

# दिवा स्थानकात एक्सप्रेस ट्रेन मधील प्रवाशांचा रेलरोको



## कळंबोली येथे मालगाडी रुळावरून हटविण्यास उशीर झाल्याने प्रवाशांचा संताप

**दिवा:-कळंबोली येथे मालगाडी रुळावरून घसरल्याने रेल्वेचे संपूर्ण वेळापत्रक कोलमडले. दिवास्थानकात मंगळूर एक्सप्रेस जवळपास दहा तासापासून थांबल्याने संतप्त प्रवाशांनी अखेर रविवारी सकाळी रेल रोको केला. यामुळे लोकल सेवा ही विस्कळीत झाली होती.**

कळंबोली मार्गावर मालगाडी रुळावरून घसरल्याने रेल्वे वाहतूक बाधित झाली. मालगाडी रुळावरून हटवण्याचे काम रेल्वे प्रशासनाकडून युद्ध पातळीवर सुरू असताना दहा तासाहून अधिक वेळ झाला तरी रेल्वे वाहतूक सुरळीत होत नसल्याने कोकण रेल्वे व मध्य रेल्वेची कोकणच्या दिशेने जाणारी वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली.गणपती विशेष ट्रेन देखील यामुळे बाधित झाल्या. रेल्वे प्रशासनाने पर्यायी मार्ग म्हणून पुणे मार्गे ट्रेन सोडण्यास सिग्नल दिला मात्र प्रवाशांनी पनवेल मार्गेच प्रवास करण्याचा आग्रह धरला.रेल्वे प्रशासनाने मालगाडी हटवण्यास विलंब केल्याने अखेर प्रवाशांचा उद्रेक होऊन प्रवाशांनी दिवा रेल्वे स्थानकात रेल रोको करत संताप व्यक्त केला. यामुळे रेल्वेची लोकल सेवा ही विस्कळीत झाली होती.कालांतराने लोकलसेवा पूर्ववत झाली.







दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २ ऑक्टोबर २०२३
पान : ५

## १ ऑक्टोबरला राज्यात ज्येष्ठ नागरिक दिवस साजरा होणार

**मुंबई :** राज्यात सर्वत्र १ ऑक्टोबर हा दिवस जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस म्हणून साजरा करण्यात येणार आहे. राज्यात सर्व जिल्हाधिकारी, स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय, निमशासकीय कार्यालये, महानगरपालिका व नगरपालिका, नगर परिषदांमार्फत जागतिक ज्येष्ठ नागरिक दिवस आयोजित केले आहे. यानिमित्ताने सार्वजनिक पदयात्रा, प्रभात फेऱ्या, सभा, विशेष कार्य केलेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी काम करणाऱ्या बिगर सरकारी संस्थांचा सत्कार, गौरव, आरोग्य शिबीर, चर्चा-परिसंवाद इ. कार्यक्रमांचे आयोजन केले आहे.













**दिवा स्टेशन येथे माजी नगरसेवक शैलेश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वच्छता मोहीम राबवली यावेळी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेत स्टेशन परिसर स्वच्छ केला!**

## घरगुती नळ जोडणी धारकांच्या थकीत बिलावरील प्रशासकीय आकारात १००% सूट

**ठाणे :** ठाणे महापालिका क्षेत्रातील थकीत घरगुती पाणी बिलावरील प्रशासकीय आकार (दंड किंवा व्याज) पूर्णत: माफ करण्याची अभय योजना ठाणे महापालिकेने जाहीर केली आहे. ही अभय योजना येत्या ३१ डिसेंबर २०२३पर्यंत लागू राहणार असून त्यानंतर मात्र नळ जोडणी खंडित करण्याबरोबरच जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे.

जे घरगुती नळ जोडणी धारक ०१ ऑक्टोबर २०२३ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत थकीत पाणी बील, चालू वर्षाच्या बिलासह एकत्रित महापालिकेकडे जमा करतील, अशा घरगुती नळ जोडणी धारकांना त्यांच्या थकीत पाणी बिलावर आकारण्यात आलेला प्रशासकीय आकारात (दंड किंवा व्याज) १०० टक्के सूट दिली जाणार आहे. या धोरणापूर्वी ज्यांनी घरगुती पाणी पुरवठा देयके जमा केली असतील त्यांना ही अभय योजना लागू नाही. तसेच, व्यावसायिक वापरासाठी नळ जोडणी घेतलेल्यांनाही ही योजना लागू नाही.

ही अभय योजना ३१ डिसेंबर २०२३पर्यंत लागू राहणार आहे. त्याचा लाभ ठाणे महापालिका क्षेत्रातील नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी केले आहे. तसेच, या अभय योजनेच्या समाप्तीनंतर ०१ जानेवारी २०२४ पासून थकबाकी रक्कम प्रलंबित ठेवणाऱ्या थकित बिल धारकांची नळ जोडणी खंडित करण्याबरोबरच जप्तीची कारवाई करण्यात येणार असल्याचे ठाणे महापालिकेने स्पष्ट केले आहे.

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २ ऑक्टोबर २०२३ पान : ६
www.diwanews.com

## 'वर्षा' येथील श्री गणेश दर्शनाने भारावले विदेशी पाहुणे

**मुंबई :–** 'गणपती बाप्पा मोरयाचा जयघोषाचा निनाद, श्री गणेश उत्सवाच्या निमित्ताने सजलेले रुप आणि आरती-मंत्रोच्चार अशा भारावलेल्या भक्तीपूर्ण वातावरणात विविध देशातील पाहुण्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी प्रतिष्ठापित श्री गणेशाचे मनोभावे दर्शन घेतले. मुंबईतील विविध देशांच्या वाणिज्य दूतावासांचे प्रमुख, वरिष्ठ अधिकारी आदी मान्यवर हे ते विदेशी पाहुणे होते. यात रशियाच्या सेंट पीटसबर्गचे उपप्रांतपाल व्लादिमीर क्याजिनीन यांच्यासह तब्बल ३० हून अधिक देशातील विदेशी पाहुण्यांचा समावेश होता.

# दिवेआगारच्या सुपारी संशोधन केंद्राच्या विस्तारीकरणास मान्यता - कृषी मंत्री धनंजय मुंडे





**मुंबई :** दिवेआगार ता.श्रीवर्धन, जि. रायगड येथील सुपारी संशोधन केंद्राच्या विस्तारीकरणास मान्यता देऊन यासाठी ५ कोटी ६४ लाख ३१ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली असल्याची माहिती कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी दिली.

मंत्रालयात आज दिवेआगार ता.श्रीवर्धन येथील सुपारी संशोधन केंद्र, गिरणे, ता.तळा येथे खार भूमी संशोधन केंद्र आणि किल्ला, ता.रोहा येथील काढणी पश्चात तंत्रज्ञान व्यवस्थापन महाविद्यालयाचे श्रेणीवर्धन करुन बी.टेक (फूड टेक्नॉलॉजी) महाविद्यालय सुरु करण्याबाबतची आढावा बैठक घेण्यात आली. त्यावेळी मंत्री श्री.मुंडे बोलत होते. यावेळी महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव अनुप कुमार, कृषी विद्यापीठाचे अधिकारी व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री मुंडे म्हणाले की, दिवेआगार येथे ५ एकर जागेत सुपारी संशोधन केंद्राच्या विस्तारीकरणास त्वरीत मान्यता देण्यात आली आहे. या प्रकल्पासाठी पाच कोटी ६४ लाख ३१ हजार रुपयांची निधीची तरतूद करण्यात आली आहे. किल्ला, ता.रोहा येथील काढणीपश्चात तंत्रज्ञान व्यवस्थापन महाविद्यालयाचे श्रेणीवर्धन करुन बी.टेक (फूड टेक्नॉलॉजी) महाविद्यालय सुरु करण्याबाबतचा आराखडा डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांनी सादर करावा. तसेच विद्यापीठाला गिरणे, ता. तळा येथे दिलेल्या जागेत उभारण्याच्या खारभूमी संशोधन केंद्राचा आराखडा तयार करुन मान्यतेसाठी सादर करण्याचे निर्देशही मंत्री श्री.मुंडे यांनी यावेळी दिले. हे आराखडे तयार करताना कोकणातील नारळ, सुपारी, आंबा या फळपिकांसोबतच विविध प्रकारच्या मसाला पिकांचाही संशोधनात समावेश करावा, तसेच श्रीवर्धन रोठा सुपारीला जीआय मानांकन मिळविण्यासाठी कार्यवाहीला गती देण्यात यावी, अशा सूचना महिला व बालविकास मंत्री कु. तटकरे यांनी केल्या.

## विधान परिषदेच्या मुंबई, कोकण विभाग पदवीधरसह शिक्षक मतदारसंघांसाठी मतदारांनी नोंदणी करण्याचे आवाहन

**मुंबई :** विधान परिषदेच्या मुंबई आणि कोकण विभागाच्या पदवीधर मतदारसंघासाठी तसेच शिक्षक मतदारसंघांसाठी मतदार नोंदणी ३० सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. या मतदार नोंदणीसाठी १ नोव्हेंबर २०२३ या अर्हता दिनांकावर आधारित पुनरीक्षण कार्यक्रम घोषित करण्यात आला असून मतदारांनी नोंदणी करावी, असे आवाहन मुंबई शहर जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर यांनी आवाहन केले आहे.

या मतदार नोंदणीसाठी पुनरीक्षण कार्यक्रमाचे टप्पे पुढीलप्रमाणे आहेत. शनिवार ३० सप्टेंबर २०२३ रोजी जाहीर सूचना प्रसिध्द केली जाईल, वृत्तपत्रातील सूचनेची प्रथम पुनर्प्रसिद्धी सोमवार १६ ऑक्टोबरला, द्वितीय पुनर्प्रसिद्धी बुधवारी २५ ऑक्टोबरला केली जाईल. अर्ज क्रमांक १८ आणि १९ द्वारे ६ नोव्हेंबर २०२३ पर्यंत दावे आणि हरकती स्वीकारल्या जातील. त्यानंतर सोमवार २० नोव्हेंबरला हस्तलिखिते तयार करून प्रारुप मतदार याद्यांची छपाई केली जाईल. या प्रारुप मतदार याद्या २३ नोव्हेंबरला प्रसिद्ध होतील. त्यावर २३ नोव्हेंबर ते ९ डिसेंबर २०२३ पर्यंत दावे आणि हरकती स्वीकारले जातील. त्यानंतर २५ डिसेंबरपर्यंत दावे आणि हरकती निकाली काढून यादीची छपाई केली जाईल आणि ३० डिसेंबरला अंतिम यादी प्रसिद्ध केली जाईल.

मुंबई शहर जिल्ह्यामध्ये एकूण १० विधानसभा मतदारसंघ असून सदर मतदारसंघाच्या मध्यवर्ती कार्यालयात मतदारसंघाचे अर्ज स्वीकारले जातील. मागील निवडणुकीत सन २०१८ ला मुंबई पदवीधर मतदारसंघासाठी एकूण १८३५३ इतकी मतदारांची अंतिम मतदार यादी तयार करण्यात आली होती.

पदवीधर मतदारसंघाच्या मतदार यादीमध्ये नाव नोंदणीसाठी ( नमुना १८) हा अर्ज असून त्यासाठी पुढील प्रमाणे अर्हता आवश्यक आहे. जी व्यक्ती भारताची नागरिक आहे आणि त्या मतदारसंघातील सर्वसाधारण रहिवासी आहे आणि तो १ नोव्हेंबर, २०२३ पूर्वी किमान ३ वर्ष भारताच्या राज्यक्षेत्रातील विद्यापीठाची एक, तर पदवीधर असेल किंवा त्याच्याशी समतुल्य असलेली अर्हता धारण करीत असेल, अशी प्रत्येक व्यक्ती मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यास पात्र आहे.

मागील निवडणुकीत (सन २०१८) मुंबई शिक्षक मतदारसंघासाठी एकूण १८८९ इतकी मतदारांची अंतिम मतदार यादी तयार करण्यात आली होती.

शिक्षक मतदार संघाच्या मतदार यादीमध्ये नाव नोंदणीसाठी (नमूना १९) हा अर्ज असून त्यासाठी पुढीलप्रमाणे अर्हता आवश्यक आहे. अर्हता जी व्यक्ती भारताची नागरिक आहे. सर्व सामान्यपणे ज्या मतदारसंघाची रहिवासी आहे व जिने दिनांक १ नोव्हेंबर, २०२३ पूर्वी ६ मागील वर्षामध्ये राज्यातील एखाद्या माध्यमिक शाळेच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेमध्ये किमान तीन वर्ष अध्यापनाचे काम केले आहे. अशी व्यक्ती मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट केले जाण्यास पात्र राहील. शैक्षणिक संस्थांची यादी पहिल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या अधिकाऱ्यांकडे उपलब्ध असेल.

शिक्षक मतदारसंघासाठी मतदार यादीत नाव दाखल करण्यासाठी केलेल्या नमुना १९ मधील अर्जासोबत संबंधित व्यक्तीने दिनांक १ नोव्हेंबर, २०२३ पूर्वी लगतच्या सहा वर्षामध्ये एखाद्या माध्यमिक शाळेच्या दर्जापेक्षा कमी नसलेल्या शैक्षणिक संस्थेमध्ये एकूण किमान तीन वर्ष अध्यापनाचे काम केले असल्याबाबत त्या शैक्षणिक संस्था प्रमुखाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

## 'आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिना' निमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यक्रम संपन्न

**ठाणे :** २८ सप्टेंबर हा दिवस "आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन" म्हणून साजरा केला जातो. या दिनाच्या पार्श्वभूमीवर बुधवारी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समिती सभागृहात तहसिलदार (सर्वसाधारण) संजय भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत "आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन" कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी जिल्हा माहिती अधिकारी मनोज शिवाजी सानप, कल्याण अपर तहसिलदार कौशल्याराणी पाटील, जनसंपर्क अधिकारी स्मितल यादव, सुनिल डगळे, समृध्दी भोईर, अर्जना पाटील, अजय आरबाड, चंद्रकांत शिरसाठ, अश्विन केदारे, राजू मुरडकर, आकाश गोरे, सुस्मिता मसणे आदी अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी माहिती अधिकार अधिनियम-२००५ विषयी बोलताना तहसिलदार भोसले यांनी माहिती अधिकार या कायद्याचा उद्देश शासन व प्रशासन पारदर्शक पध्दतीने चालावे, हा आहे. माहितीचा अधिकार याचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार आहे. यामध्ये एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे, दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे, सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे आदींचा समावेश या अधिकारात असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी स्मितल यादव यांनी केले तर उपस्थितांचे आभार कल्याण अपर तहसिलदार कौशल्याराणी पाटील यांनी मानले. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध शाखांमधील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

**आरोग्य विभागातील रिक्त पदांसाठी मेगा भरती, २ लाख ५६ हजार ८९७ अर्ज प्राप्त**

**मुंबई :** सार्वजनिक आरोग्य विभागातील रिक्त पदांची भरती करण्यासाठी आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत प्रयत्नरत होते. त्यांच्या पाठपुराव्यामुळे भरतीची प्रक्रिया सुरू झाली. याबाबत त्यांनी विविध बैठकाही घेतल्या. ही भरती प्रक्रिया टीसीएस कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. भरती प्रक्रिया गतीने व पारदर्शकपणे पूर्ण करण्यासाठी तानाजी सावंत यांनी कंपनीच्या प्रतिनिधींसमवेत घेतलेल्या बैठकीत निर्देशही दिले. तसेच याबाबत विभागाने कंपनी प्रतिनिधीसोबत नियतकालिक आढावा बैठक घेऊन भरती प्रक्रियेला गती देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

# दिवा विकास प्रतिष्ठानच्या राजाचे अकराव्या दिवशी मोठ्या उत्साहात विसर्जन

## दिवावासीयांनी दिला लाडक्या बाप्पाला भक्ती भावात निरोप



दिवा शहरातील मानाचा गणपती असणाऱ्या दिवा विकास प्रतिष्ठानच्या राजाचे अकराव्या दिवशी मोठया उत्साहात विसर्जन करण्यात आले.

दिवा शहरातील लोकनेते माजी नगरसेवक आणि शिवसेना दिवा उपशहर प्रमुख शैलेश मनोहर पाटील यांच्या,दिवा प्रतिष्ठानच्या वतीने दिवा विकास प्रतिष्ठान च्या राज्याची प्रत्येक वर्षी स्थापना करण्यात येते. सदर गणपती बाप्पाच्या दर्शनासाठी विभागांतील अनेक प्रतिष्ठीत मंडळी, अनेक नागरीक आवर्जून उपस्थित राहतात. गणपती उत्सवाच्या दिवसांमध्ये, दिवा प्रतिष्ठानच्या वतीने अनेक सामाजिक, धार्मिक उपक्रम राबऊन, बाप्पाची सेवा केली जाते. दिवा विकास प्रतिष्ठानच्या राजाचे मोठ्या जल्लोषात दिवा पश्चिम येथील खाजगी तलावात विसर्जन करण्यात आले. सदर गणपती बाप्पाच्या विसर्जन मिरवणुकीसाठी प्रतिष्ठानचे अनेक कार्यकर्ते, विभागांतील महिला, नागरीक, लहान मुले स्वयंमस्फूर्तीने सहभागी झाले होते.





दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

सोमवार, दि. २ ऑक्टोबर २०२३ | पान : ८

www.diwanews.com

### इर्शाळवाडीच्या चिमुकल्यांना मुख्यमंत्री निवासस्थानी गणरायाच्या आरतीचा मान

**मुंबई :** मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यावरील श्री गणेशाच्या आरतीचा मान मंगळवारी (दि. २६) इर्शाळवाडी दुर्घटनेत अनाथ झालेल्या चिमुरड्यांना मिळाला. इर्शाळवाडीतील आदिवासी बांधव काल थेट मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी पोहोचले..त्यांच्याहस्ते गणेशाची आरती झाली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्वत:च्या हाताने बाल गोपाळांना मोदक भरवले आणि त्यांचा सहकुटुंब शाही पाहुणचार केला. चिमुरड्यांनी केलेल्या 'गणपती बाप्पा मोरया'च्या गजरात वर्षावरील वातावरण भारावून गेले.

# भंडार्ली डम्पिंगच्या विरोधात माजी झेडपी सदस्य रमेश पाटील यांचा आमरण उपोषणाचा इशारा

**ठाणे : भंडार्ली डम्पिंग हटवण्यासाठी ठाणे महापालिका आयुक्तांनी दिलेला शब्द न पाळल्यामुळे या गावातील नागरिकांनी भंडार्ली डम्पिंग हटवण्यासाठी ग्रामस्थांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. त्यातच आता ठाणे जिल्हा परिषदेचे माजी सदस्य रमेश पाटील यांनी येत्या २ ऑक्टोबरपासून आमरण उपोषण करणार असल्याचे ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री सचिव कार्यलयामार्फत मुख्यमंत्री यांच्याकडे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.**



ठाणे जिल्ह्यातील जिल्हापरिषद खोणी गटातील भंडार्ली गाव हे ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये येत नसताना संपूर्ण ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील कचरा भंडार्ली येथे गेल्या वर्षभरापासून टाकण्यात येत आहे. मार्च २०२२ मध्ये त्यावेळचे पालकमंत्री व विद्यमान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे महापालिकेमध्ये भंडार्ली डम्पिंग बाबत बैठक झाली. त्यावेळी आमदार राजू पाटील व माजी आमदार सुभाष भोईर आणि १४ गावातील सर्व पक्षीय कार्यकर्ते यांच्या समवेत चर्चा होवून ११ महिन्यासाठी भाडे तत्वावर ठाणे महापालिकेचा कचरा भंडार्ली डम्पिंगला टाकला जाईल असे सांगितले होते. त्याला लोकप्रतिनिधींसह १४ गावातील नागरिकांनी इच्छा नसताना होकार दर्शविला.

त्यावेळी ११ महिन्यांचा करार संपल्यावर त्वरित भंडार्ली डम्पिंग बंद केला जाईल असे सांगितले होते. त्याची समाप्तीची तारीख फेब्रुवारी २०२३ मध्ये होती. त्यानंतर भंडार्ली डम्पिंग बंद होणे गरजेचे होते पण ते चालूच राहिले. स्थानिक आमदार राजू पाटील यांच्याकडे या संदर्भात तक्रार केली असता १४ जुलै २०२३ रोजी डम्पिंगवर पाहणी करण्यासाठी आले होते व दुसऱ्या दिवशी १५ जुलै २०२३ रोजी आमदार राजू पाटील व ग्रामस्थ यांची ठाणे महापालिका आयुक्त यांच्यासोबत चर्चा करून दोन महिन्याचा वेळ वाढून घेतला त्याला ग्रामस्थांनी सहकार्य केले. त्यानुसार १५ सप्टेंबर रोजी भंडार्ली डम्पिंग बंद केले जाईल असे आयुक्त ठाणे महापालिका यांनी सांगितले होते. परंतु ते बंद झाले नाही, १८ संप्टेंबर रोजी माजी जिल्हापरिषद सदस्य रमेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली लोकशाही मार्गाने १४ गावातील ग्रामस्थांनी निषेध करून प्रशासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी अजून १५ दिवसांची वेळ वाढवून घेतली असल्याचे आमदार राजू पाटील यांच्या मार्फत समजले. त्यावेळी आंदोलन स्थगित केले. परंतु आता ३० सप्टेंबर २०२३ ही भंडार्ली डम्पिंग बंद करण्याची अंतिम तारीख देण्यात आली असून त्यापुढे एक दिवसही डम्पिंग वर कचरा टाकू दिला जाणार नाही याची प्रशासनाने नोंद घ्यावी. तसे झाल्यास एक जागरूक नागरिक म्हणून भंडार्ली डम्पिंग कायमस्वरूपी बंद करण्यासाठी ०२ ऑक्टोबर महात्मा गांधी जयंतीनिमित्त लोकशाही मार्गाने भंडार्ली नाका येथे आमरण उपोषण करणार असल्याचे माजी जिल्हापरिषद सदस्य रमेश पाटील यांनी दिला आहे.

## मालगाडी अपघातामुळे कोकण मार्गावरील प्रवाशांचे हाल

**दिवा:– शनिवारी सायंकाळी कळंबोली येथे घसरलेली मालगाडी वेळेत न हटवल्याने कोकण मार्गावरील प्रवाशांचे प्रचंड हाल झाले,तर दिव्यात रेलरोको मुळे लोकल प्रवाशांचे हाल झाले.**

**तर दिव्यातील रेलरोको मुळे लोकल प्रवाशांचे हाल**

तब्बल एक तास लोकल सेवा बंद राहिल्यानंतर दहा वाजल्यापासून मध्य रेल्वेच्या लोकल मार्गावरील जलद व धीम्या गतीच्या लोकल सेवा पूर्ववत झाल्या.या मार्गावरील मेल एक्सप्रेस ही सुरू झाल्याची माहिती दिवा स्टेशनचे स्टेशन मास्तर मनोज कुमार गुप्ता यांनी दिली.

कोकणात जाणाऱ्या मेल एक्सप्रेसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी दिवा स्टेशन येथे गाडी आठ तासाहून अधिक काळ थांबल्याने कोकण रेल्वे मार्गाच्या पटरीवरून लोकल मार्गाच्या पट्टीवर येत रेल रोको केल्याची माहिती मनोज गुप्ता यांनी दिली. प्रवाशांना कल्याण मार्गे पुढील प्रवास करण्याचा सिग्नल दिला असतानाही प्रवासी पनवेल मार्गे प्रवास करण्याच्या मागणीवर ठाम राहिले.त्यानंतर संतप्त झालेल्या प्रवाशांनी लोकल रेल्वे सेवा ठप्प केली. मालगाडी कळंबोली येथे घसरल्यानंतर ती हटवण्यात बारा तासानंतर ही यश न आल्याने रेल्वेच्या सेवेवर परिणाम झाला.माल गाडी न हटवल्याने मेल गाडीतील प्रवाशांचे हाल झाले तर रेल रोको मुळे प्रवाशांचे हाल झाले.

## राज ठाकरे यांनी सर्वपक्षीय नेत्यांची भेट घेतली तर ठाणेकरांचा टोल प्रश्न त्वरित मार्गी लागेल – आनंद परांजपे

**ठाणे:** राज ठाकरे यांच्या घरी शिवतीर्थावर सर्वपक्षीय नेते त्यांना भेटत असतात. राज ठाकरे यांचे या सर्वच नेत्यांशी सलोख्याचे संबंध आहेत. टोलप्रश्नी मार्ग काढायचा असेल, ठाणेकरांचा हा प्रश्न सोडवायचा असेल तर राज ठाकरे यांनी शिष्टमंडळासह या नेत्यांची भेट घेऊन मार्ग काढावा, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र प्रवक्ते, पालघर व ठाणे जिल्हा समन्वयक तसेच ठाणे जिल्हाध्यक्ष आनंद परांजपे यांनी व्यक्त केले. यावेळी परांजपे यांनी अशाप्रकारे मनसैनिकांना उन्हातान्हात उभे हा प्रश्न सुटणार नाही, त्यांना उन्हातान्हात उभे करण्याचे नाटकीय आंदोलन करण्याची मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांना सवय असते असे बोलून खोचट टीका केली.

## आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिनानिमित्त ठामपातर्फे व्याख्यानाचे आयोजन

**ठाणे :** शासन व प्रशासन पारदर्शक, जबाबदारीने चालावे हा उद्देश माहिती अधिकार या कायद्याचा आहे. हा कायदा लागू होवून १८ वर्षे झाली असून गैरप्रकार या कायद्यामुळे उघड झाले आहे. सामान्य माणसाला त्याच्या नागरिक म्हणून असणाऱ्या शक्तीची जाणीव करुन देणरा व सामान्य माणसाला न्याय देणारा हा कायदा असल्याचे माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनचे अध्यक्ष सुभाष बसवेकर यांनी नमूद केले.

२८ सप्टें. हा दिवस आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनाच्या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिकेच्यावतीने बुधवारी कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात माहिती अधिकार कायदा या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. यावेळी उपायुक्त उमेश बिरारी उपस्थित होते.

माहितीचा अधिकार याचा अर्थ कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे असलेली किंवा त्याच्या नियंत्रणात असलेली व या अधिनियमान्वये मिळवता येण्याजोगी माहिती मिळविण्याचा अधिकार आहे. यामध्ये एखादे काम, दस्तऐवज, अभिलेख यांची पाहणी करणे, दस्तऐवजांच्या किंवा अभिलेखांच्या टिप्पण्या, उतारे किंवा प्रमाणित प्रती घेणे, सामग्रीचे प्रमाणित नमुने घेणे आदींचा समावेश या अधिकारात असल्याचे सुभाष बसवेकर यांनी सांगितले.

